## प्रेसनोट दि. २०/०७/२०१७

### खुनाच्या गुन्हातील फरारी असलेल्या सराईत गुन्हेगारांना १० महिण्यानंतर गुन्हे शाखा, युनिट १ च्या टिम कडून जेरबंद.

गुन्हे शाखा युनिट १ कडील कर्मचारी गजानन सोनुने, उमेश काटे यांना त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत, खडक पोलीस ठाणे येथील खूनाच्या गुन्हयातील फरारी सराईत गुन्हेगार नामे १.दिनेश मारूती धावडे, २. मनोज ऊर्फ पप्या चंद्रकांत शिर्के हे अलिबाग, जिल्हा रायगड येथे असले बाबत माहितीची प्राप्त झाली होती. सदर बातमी प्रमाणे गुन्हे शाखा युनिट १ चे इन्चार्ज वरिष्ठ पो निरी नितीन भोसले पाटील यांनी वरिष्ठांचे आदेशा प्रमाणे युनिट १ कडील स्टाफसह जावुन सापळा लावुन फरारी आरोपी नामे १.दिनेश मारूती धावडे, वय २७ रा बोपखेल, पुणे, २. मनोज ऊर्फ पप्या चंद्रकांत शिर्के, वय २७, रा विठठल रूक्मीणी मंदीरा समोर, कालीदास घुले चाळ, बोपखेल, पुणे यांना अलिबाग येथे जावुन, तेथे सदर परिसराची माहिती घेवुन, ते असलेल्या ठिकाणी सापळा लावुन, त्यांना खडक पोलीस स्टेशन गु.र.नं. २६७/२०१६ भा.द.वि.कलम ३०२, १२०(ब),१४३, १४७,१४८,३४ आर्म ॲक्ट कलम ३(२५), मुंबई पोलीस कायदा कलम ३७(१) सह १३५ या गुन्हयाचे कामी ताब्यात घेतले आहे.

वरील नमुद आरोपी यांचे मागावर पुणे शहर पोलीस हे होते. परंतु ते पोलीसांना वारंवार हुलकावणी देवून पळ काढीत होते. गुन्हे शाखा युनिट १ कडील अधिकारी व स्टाफने वरील आरोपींचा अत्यंत सुसंगतरित्या बातमीदारांचे जाळे तयार करून, न कंटाळता, त्याचे मागावर राहुन सुमारे १० महिण्यानंतर प्राप्त बातमीचे आधारे नवख्या ठिकाणी अत्यंत धाडसाने व नियोजन पुर्ण सापळा लावुन, दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले आहे. सदरचे दोन्ही आरोपींवर यापुर्वी भोसरी पो स्टेशन येथे संतोष कुरावत यांचेवर प्राण घातक हल्ला केलेचा गुन्हा दाखल आहे. तसेच त्यांचे विरूध्द विश्रांतवाडी पो स्टे येथे चोरी केलेला गुन्हा दाखल आहे.

सदरची कारवाई ही श्री. प्रदीप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त सो., गुन्हे, श्री. पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त सो., गुन्हे. श्री सुरेश भोसले, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नितिन भोसले-पाटील, स.पो.निरी. धनंजय कापरे, पो उप निरी. दिनेश पाटील, स.पो.फौज. राजाराम सुर्वे, पो हवा प्रकाश लोखंडे, पो हवा उमेश कोटे, पो ना अशोक माने, पो शि गजानन सोनुने, पो ना सुधिर माने, पो शि प्रशांत गायकवाड, पो शि मोहन येलपले, पो हवा जेनेडी, मोकाशी, पो ना इरफान मोमीन, इम्रान शेख, श्रीकांत वाघवले, तुषार खडके यांनी केली आहे.

